नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 22/03/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

## घरफाडी

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावर गोकुल रेस्टॉरेन्ट अन्ड बार गिरडकर लेआउट उमरेड येथे फिर्यादी नामे– अश्विन वाल्मीक कावरे, वय 39 वर्षे, रा. मॉ वैष्णवी अपार्टमेन्ट बस स्टॉप जवळ, उमरेड जि. नागपुर याने दि. 19/03/2021 चे 20.05 वा. आपला बार बंद केला. दि. 20/03/2021 रोजी लॉक डाऊन मुळे त्याने शासकीय आदेशाने बार बंद ठेवले होते. दि. 21/03/2021 चे 11.00 वा. दरम्यान बारचे मॅनेजर गोकुल रेस्टॉरेट ॲन्ड बार कडे गेले असता, बार चे शटर तुटलेले दिसले. त्यामुळे मॅनेजरने फिर्यादीला घटनेची माहिती दिली असता फिर्यादीने बारची पाहणी केली तेव्हा अज्ञात आरोपीने बार चे शटर तोडुन आत प्रवेश करून बार मधील विविध प्रकारची विदेशी दारू किं. 2,46,100/–रू., डिव्हीआर मशिन किं. 3,000/–रू., 2 कुलर राम कंपनीचे किं. 6,000/–रू. असा एकुण 2,55,100/–रू. चा मुद्देमाल चोरून नेलेला दिसून आला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. राजेश पाटील पो.स्टे. उमरेड मो.क्र. 90499 89341 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 01 कि. मी अंतरावर मौजा बुटीबोरी प्रसाद कॉलनी येथे दिनांक 20/03/2021 चे 17.00 वा. ते दिनांक 21/03/2021 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगेश मारोतराव हुके, वय 41 वर्ष, रा. प्रभाग क्रं 06 प्रसाद कॉलनी, प्लॉट नं 67 बुटीबोरी हे आपल्या परीवारासह त्यांचे मुळगावी येथे गेले होते. दि. 21/03/2021 रोजी ते घरी आले असता त्यांना त्यांचे घराचे मागील दरवाज्याचे कुलुप तुटलेले दिसले व बेडरूममध्ये असलेल्या आलमारीचे सामान अस्तव्यस्त पडुन दिसले. अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घरातुन कपाटातुन कि. 62,500/–रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री मोरखडे मो नं 8208751249 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 3 कि.मी. मौजा नायगाव ठाकरे येथे दिनांक 20/03/2021 चे 19:00 वा. ते 19.15 वा. दरम्यान अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–31/सीएक्स–0679 मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– राजेन्द्र महादेवराव बन्सरे वय 58 रा. सुरळी हा गंभीर जखमी झाला. त्यास पीएचसी जलालखेडा येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सर.तर्फे. पो.शि. दिनेश जोगेकर, पो.स्टे. जलालखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रभाकर घोरमाडे 9923121440 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 3 कि.मी. कळमेश्वर मोहपा डाबंरी रस्ता मौजा घोराड येथे दिनांक 20/03/2021 चे 15:30 वा. पुर्वी अज्ञात बोलेरो मालवाहु चालक आरोपीने त्याचे वाहन रस्त्याचा मधोमध उभे केले होते. त्यामुळे एम.एच–31/ए.एन– 9970 क्रमांकाचा मोटरसायल चालकाने पाठीमागुन बोलेरो गाडीला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– रत्नाकर यशवंतराव गोतमारे, वय 52 वर्ष, रा. वांडोना यांच्या डोक्याला मार लागल्याने ते जखमी होवुन त्यांचा मृत्यु झाला. तसेच सदर बोलेरो चालक याने मृतकास कोणतेही वैदयकीय मदत न पुरवता तसेच पोलिसांना अपघाताची माहीती न देता घटनास्थळावरून निघुन गेला.

सदर प्रकरणी सर.तर्फे. सपोनि श्री प्रविण मुंडे, पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. सहकलम 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री प्रविण मुंडे 9970094709 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर